दैनिक
# महावृत्त
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990
लातूर वर्ष ४ थे अंक १९७ वा गुरूवार दि.२३ जानेवारी २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.




## १५.७० लाख कोटींच्या गुंतवणुकीचे ५४ सामंजस्य करार

दावोस : वृत्तसंस्था-दावोसमधील वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममध्ये इतिहास घडला असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्त्वात महाराष्ट्राने आजच्या दुस-या दिवशीपर्यंत १५.७० लाख कोटी गुंतवणुकीच्या एकूण ५४ सामंजस्य करारावर स्वाक्षरी केल्या आहेत. यातून १५.९५ लाख रोजगारनिर्मिती होईल.



आजच्या सामंजस्य करारांपैकी सर्वांत मोठ्या गुंतवणुकीचा करार हा रिलायन्स समूहाचा असून, पेट्रोकेमिकल्स, पॉलिस्टर, नवीनीकरणीय ऊर्जा, बायोएनर्जी, हरित हायड्रोजन, ग्रीन केमिकल्स, औद्योगिक क्षेत्रविकास, रिटेल, डेटा सेंटर्स, टेलिकम्युनिकेशन्स, आदरातिथ्य आणि रिअर इस्टेट या क्षेत्रात ते ३,०५,००० कोटी इतकी गुंतवणूक करणार आहेत. या एका करारातून ३ लाख रोजगारनिर्मितीचा अंदाज आहे.

रिलायन्स समूहासोबत ३ लाख ५ हजार कोटींचा सामंजस्य करार करण्यात आला असून यातील बहुसंख्य गुंतवणूक ही सेवा क्षेत्रात होणार असल्याने सुमारे ३ लाख रोजगार निर्मिती यातून होईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले, तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वात नवभारताच्या निर्मितीत योगदान देणारा हा करार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे महाराष्ट्र १ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे पहिले राज्य बनवावे, हे स्वप्न आहे. त्यादृष्टीने आम्ही ही गुंतवणूक करणार आहोत, असे रिलायन्स समूहाचे अनंत अंबानी यांनी यावेळी सांगितले.

दुसरी मोठी गुंतवणूक ही ॲमेझॉन करणार असून, ती ७१,७९५ कोटी रुपये इतकी आहे. एमएमआर क्षेत्रात डेटा सेंटर्सच्या माध्यमातून या गुंतवणुकीतून ८३,१०० इतके रोजगार निर्माण होणार आहेत. गेल्या २ दिवसांत जे सामंजस्य करार झाले, त्यातून राज्याच्या सर्व भागात गुंतवणूक होत असून, समतोल विकासाचा उद्देश यातून साध्य होणार आहे. या एकूण करारांपैकी उद्योग विभागाने ११.७१ कोटींचे करार केले असून, एमएमआरडीएने ३.४४ लाख कोटी तर सिडकोने ५५,२०० कोटींचे करार केले आहेत.

टोनी ब्लेअर यांची भेट

दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज ब्रिटनचे माजी पंतप्रधान टोनी ब्लेअर यांची भेट घेतली. वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम दरम्यान ही भेट झाली. या दोघांमध्ये ऊर्जा आणि सार्वजनिक वाहतूक क्षेत्रासंदर्भात चर्चा झाली. टोनी ब्लेअर यांनी लवकरच भारतात येणार असल्याचा मनोदय यावेळी व्यक्त केला. याशिवाय, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ुंडई मोटर्सचे कार्यकारी उपाध्यक्ष बम किम यांची भेट घेतली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी डीपी वर्ल्डचे अध्यक्ष सुलतान अहमद बिन सुलाएम आणि त्यांचे भारताचे प्रबंध संचालक, सीईओ रिझवान सोमर यांचीही भेट घेतली. महाराष्ट्रात इंडस्ट्रीयल पार्क, लॉजिस्टीक इत्यादी क्षेत्रात सहकार्याबाबत यावेळी चर्चा झाली.

## पोलीस असल्याचे सांगून १ लाख २० हजार रु६ किंमतीचे सोन्याचे दागिने लांबविले

केज/प्रतिनिधी -आम्ही पोलीस असून तुमच्या गळ्यातील सोन्याचे दागिने काढून ठेवा असे म्हणून महिलेला दागिने काढण्यास सांगून हातचलाखी करून खरे १ लाख २० हजार रु. किमतीचे मिनी गंठण व कानातील झुंबर हे दागिने घेवून पोबारा केला आहे. या बाबतची माहिती अशी की, दिनांक २२ जानेवारी रोजी सकाळी ११:०० वाजण्याच्या सुमारास रामकंवर उर्फ अनिता शंकर राऊत वय ५० वर्षे ही महीला केज-कळंब रोड लगत असलेल्या साई नगर येथील धुणी-भांड्याचे काम आटोपून विठाई पुरमकडे जात असताना लोहीया यांचे हार्डवेअरच्या दुकानाच्या बाजुने जात असताना समोर एक व्यक्ती ऊभा होता. त्याच वेळी अचानक पाठी मागुन मोटार सायकलवरून एक व्यक्ती आला. त्याने डोक्याला हेल्मेट घातले होते. त्याने रामकांवर उर्फ अनिता हिच्या जवळ गाडी ऊभी करून म्हणाला की, शितल शिंदे यांचे घर कोठे आहे ? त्यांची पेपर मध्ये बातमी आलेली आहे. मी पोलीस आहे. असे म्हणुन खाकी ड्रेस असलेले ओळखपत्र दाखवले. त्या नंतर तो म्हणाला की, तुम्ही तुमच्या गळ्यातील व कानातील सोन्याचे दागीने काढुन बॅगमध्ये ठेवा. बायकांनी असे दागिने घालुन फिरायचे नसते. आमचे साहेब भेट दयायला येत आहेत. असे म्हणाल्याने त्या महिलेने कानातील झुंबर काढून पर्स मध्ये ठेवले. त्यानंतर त्याने गळ्यातील सोन्याचे मिनी गंठण काढण्यास सांगितले. ते लवकर न निघल्याने त्याने गळ्यातील मिनीगंठण काढुन पर्समध्ये काढून टाकल्या सारखे केले. म्हणून पर्स चेक केली असता त्यानध्ये बनावट गंठण दिसले. त्यामुळे रामकंवर उर्फ अनिता यांनी त्याची मोटार सायकल धरण्याचा प्रयत्न केला. मात्र दोघे अनोळखी ईसम त्यांची मोटार सायकल क्र. २८२९ यावर बसुन केजच्या दिशेने निघुन गेले. रामकंवर उर्फ अनिता राऊत यांच्या तक्रारी वरून केज पोलीस ठाण्यात दोन अज्ञात ठकसेना विरुद्ध गु. र. नं. ३३/२०२५ भा. न्या. सं. २०४, ३(५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी पोलीस हेडकॉन्स्टेबल श्रीकांत चौधरी हे करीत आहेत.

## लातूरच्या ट्युशन एरियामध्ये पोलिसांचे कोम्बिंग ऑपरेशन. अनेकावर कारवाई..



लातूर :- लातूरच्या ट्युशन एरियामध्ये पोलिसांचे कोम्बिंग ऑपरेशन. अनेकावर कारवाई.. ०५ पोलीस अधिकारी आणि ४७ पोलीस अंमलदार,वाहनांचा ताफा यांनी एकत्रित येत लातूर येथील ट्युशन एरियामध्ये कोम्बिंग ऑपरेशन केले.

पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांचे आदेशान्वये, अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे, उपविभागीय पोलीस अधिकारी (लातूर शहर) रणजीत सावंत यांचे मार्गदर्शनात लातूर येथील ट्युशन एरियात पोलीस ठाणे शिवाजीनगरचे पोलीस निरीक्षक दिलीप सागर व पोलीस अंमलदारांनी दिनांक २१/०१/२०२५ रोजी संध्याकाळी ०६ वाजल्यापासून रात्री १० वाजेपर्यंत अचानकपणे कोम्बिंग ऑपरेशन केले.

शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे ०५ पोलीस अधिकारी, ४७ पोलीस अमलदारांनी हे कोंबिंग ऑपरेशन पार पाडले.

लातूर येथील ट्युशन एरियामध्ये कारवाई करत ९४ लोकांविरुद्ध मोटार वाहन कायद्यान्वये कार्यवाही करून ८३ हजार २५० रुपयाच्या दंड आकारण्यात आला तर ०७ लोकांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे.

संपूर्ण राज्यामध्ये लातूर शहर शैक्षणिक पॅटर्नसाठी ओळखला जातो. राज्यभरातून हजारो विद्यार्थी येथे शिक्षणासाठी येत असतात. लातूर येथील ट्युशन एरियामध्ये यामुळे विद्यार्थ्यांची प्रचंड गर्दी होत असते. या ठिकाणी काही असामाजिक तत्त्व सक्रिय होऊ नये,या भागांमध्ये विनाकारण फिरणाऱ्या असामाजिक तत्त्वांवर वचक बसावा यासाठी शिवाजीनगर पोलिसांनी कारवाई केली आहे.

ट्युशन एरिया मध्ये अशा स्वरूपाची कारवाई सातत्याने होत असल्यामुळे या भागात गुंडगिरी करणाऱ्यामध्ये दहशत निर्माण झाली आहे. या कोम्बिंग ऑपरेशन मागचा उद्देश हा संपूर्ण राज्यातून शिक्षणासाठी आलेल्या विद्यार्थ्यांना भयमुक्त वातावरणात त्यांच्यातील शैक्षणिक गुणवत्ता विकसित करता यावी हा असून या नंतर ही अशा प्रकारच्या कारवाया लातूर पोलीस कडून करण्यात येणार आहेत.

## सोयाबीन खरेदीला दुसऱ्यांदा २८ फेब्रवारी पर्यंत मुदतवाढ द्या.! माजी आमदार बब्रुवान खंदाडे यांची पणन मंत्र्यांकडे मागणी

अहमदपूर दि.२२ -नगदी पीक म्हणून आणि ऐंशी टक्के सोयाबीन पेरणी क्षेत्राचा विचार करून सोयाबीन खरेदीला दिलेली मुदतवाढ अपुरी असून शेतकरी रब्बीच्या पेरणीमूळे सोयाबीन रास करू शकला नाही तसेच तूर फवारणी आणि ओलाव्याचे बंधन तर कधी बारदाना शॉर्टेज या बाबी मूळे शेतकरी सूरूवातीचा दिड महिना माल केंद्रावर आणू शकला नाही तसेच राज्यात झालेली नोंदणी व शिल्लक खरेदीचा विचार करून तातडीने २८ फेब्रुवारी पर्यंत खरेदी मुदतवाढ द्यावी अशी आग्रही मागणी राज्याचे पणन मंत्री जयकुमार रावल यांच्याकडे एका निवेदनाद्वारे माजी आमदार बब्रुवान खंदाडे यांनी केली आहे. पणन मंत्र्यांना दिलेल्या निवेदनात पुढे म्हटले आहे की, केंद्र सरकारद्वारा नाफेड मार्फत राज्यात हमी भावाने सोयाबीन खरेदी चालू केली आहे.शासनाने जर खरेदी चालू केली नसती तर सोयाबीनचे भाव ३५०० रुपये वर स्थीर झाले असते. आज सरासरी हजार रुपये जरी शेतकऱ्यांना वाढीव मिळाले तरी सरकारच्या बाजारातील हस्तक्षेपामुळे राज्यातील शेतकऱ्यांना बाजारपेक्षा अब्जावधी रुपये जास्त नक्कीच मिळाले आहेत.त्या बद्दल राज्य सरकारचे अभिनंदनच केले पाहीजे. यावर्षी बाजारात हरभरा व तुरीला भाव हमीभावापेक्षा जास्त असल्यामुळे तुर व हरभरा खरेदी फार करावी लागणार नाही असे आज तरी वाटते. त्यामूळे विशेष बाब म्हणून २८ फेब्रुवारी २०२५ पर्यंत खरेदीस मुदतवाढ द्यावी. तसेच जर मुदतवाढ शक्य नसेल तर बाजारातील भावांवर ८०० रुपये प्रति क्विंटल प्रमाणे शेतकऱ्यांना अनुदान द्यावे अशी आग्रही मागणी निवेदनाद्वारे केली आहे. या शिष्टमंडळात ज्ञानोबा बडगीरे, माजी नगरसेवक डॉ.सिध्दार्थकुमार सूर्यवंशी, रामानंद मूंडे, धनंजय जोशी आदींची प्रमुख उपस्थिती होती. या निवेदनाच्या प्रती कार्यकारी संचालक/व्यवस्थापक नाफेड मुंबई,एम.डी. मार्केटिंग फेडरेशन मुंबई तसेच डी.एम.ओ. मार्केटिंग फेडरेशन लातूर यांना दिले आहे. राज्यशासन या प्रकरणी तातडीने सकारात्मक भूमिका घेईल असे अश्वासन पणनमंत्री जयकुमार रावल यांनी शिष्टमंडळास दिले.



## महावितरण प्रीपेड मिटर रद्द करा..! ग्राहकाला विश्वासात न घेता मिटर बदलु नये - विरेंद्र लगाडे जिल्हाध्यक्ष यांची मागणी

नवी मुंबई / के. एच. हनवते :- दि.- २२ जानेवारी रोजी वाशी येथील महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या ऑफिसमध्ये जाऊन अधीक्षक अभियंता पाटील व कार्यकारी अभियंता बनसोडे यांची भेट घेऊन त्यांना निवेदन देण्यात आले या निवेदनामध्ये सध्या महाराष्ट्र राज्य विद्युत महावितरण कंपनीने जे प्रीपेड मीटर ग्राहकांना विश्वास न घेता बदलण्याची मोहीम चालू केली आहे त्याबद्दल जाहीर निषेध नोंदवला आहे व अधिकाऱ्यांना सूचना वजा इशारा दिला की तुम्ही कुठल्याही एका व्यवसायिकाच्या फायद्यासाठी सर्वसामान्य ग्राहकांना वेठीस धरू नका अन्यथा आमचे पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष सर सेनानी आनंदजी राज आंबेडकर साहेब यांच्या आदेशाने तुमच्या कार्यालावर फार मोठ्या प्रमाणात आंदोलन करण्यात येईल याची जिम्मेदारी संपूर्णपणे तुमची राहील ग्राहकाला विश्वासात घेतल्याशिवाय त्यांचा विद्युत मीटर बदली करता येत नाही कारण विद्युत मीटर ही ग्राहकाची प्रॉपर्टी आहे ग्राहकाने त्याच्यासाठी डिपॉझिट भरलेले आहे त्यामुळे ग्राहकाच्या परवानगीशिवाय ग्राहकाच्या लेखी परवानगीशिवाय कंपनीला कुठल्याही प्रकारचा मीटर हा बदली करता येत नाही तरीसुद्धा कंपनी एखाद्या व्यावसायिकाच्या फायद्यासाठी सर्वसामान्यांना वेठीस धरत असेल तर आम्ही गप्प बसणार नाही त्यामुळे ताबडतोब प्रीपेड मीटर बदली करण्याची मोहीम थांबवावी अन्यथा याचे परिणाम तुम्हाला बघावे लागतील. सध्या जे लाईट बिल येते त्या लाईट बिला वरती लाईट बिल भरण्यासाठी मुदत दिलेली असते त्यामुळे त्या मुदतीमध्ये ग्राहक पैसे जमा करून बिल भरत असतो परंतु या प्रीपेड मीटर मध्ये अशा प्रकारची कुठलीही सुविधा ग्राहकाला मिळणार नाही व त्यांना अंधारात बसण्याची वेळ येईल त्यामुळे तुम्हाला पुन्हा एकदा इशारा देतो की प्रीपेड मीटर बदली करण्याची जी मोहीम तुम्ही चालू केली आहे ती ताबडतोब स्थगित करावी अन्यथा तुमचा एकही लाईनमन तुमचा एकही वायरमेन किंवा इतर कंपनीचे कुठलेही कर्मचारी आम्ही आमच्या एरियामध्ये घुसू देणार नाहीत यावर कार्यकारी अभियंता बनसोडे यांनी आम्हाला आश्वासन दिले की नवी मुंबईच्या कुठल्या विभागा मध्ये प्रीपेड मीटर बसवण्यात येणार नाहीत भविष्यात अशी वेळ आली तर सर्व ग्राहकांना विश्वास घेऊन ही प्रक्रिया करण्यात येईल जर ग्राहक यांनी संमती दिली तरच प्रीपेड मीटर बसवतील अन्यथा प्रीपेड मीटर बसविण्यात येणार नाहीत असे आश्वासन कार्यकारी अभियंता बनसोडे यांनी आम्हाला दिले हे निवेदन देण्यासाठी खालील पदाधिकारी उपस्थित होते वीरेंद्र लगाडे नवी मुंबई जिल्हाप्रमुख, सौ. रेखा इंगळे महिला जिल्हाध्यक्ष, संगीता चौधरी उपजिल्हाध्यक्ष, ढवळे मॅडम वाशी विभाग प्रमुख, सुश्मिता मोहिते नेरूळ विभाग प्रमुख, सुनील साळवे नवी मुंबई जिल्हा सचिव इत्यादी कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.



## संपादकीय....

## अमेरिका व भारताच्या हिताचे

अमेरिकेचे ४७वे राष्ट्राध्यक्ष म्हणून रिपब्लिकन पक्षाचे डोनाल्ड ट्रम्प यांनी पुन्हा शपथ घेतली असून, संपूर्ण जगाने याचे सावधपणे स्वागत केले आहे. अमेरिकी जनतेला त्यांचा आत्मविश्वास, त्यांची संपत्ती, त्यांची लोकशाही आणि त्यांचे स्वातंत्र्य परत बहाल केले जाईल. या क्षणापासून अमेरिकेचे अधःपतन थांबले असून, अमेरिकेत सुवर्णयुग येईल, असे उद्गार त्यांनी काढले आहेत. अमेरिकेतील प्रत्येक राष्ट्राध्यक्ष आपण परिवर्तन करणार असल्याचे सांगत असतो; पण ट्रम्प यांची भाषा एखाद्या साहित्यिकाला मागे टाकेल अशीच असते. या राष्ट्राध्यक्षाच्या शपथविधी सोहळ्यास मावळते राष्ट्राध्यक्ष हजर असतात. निवडणुका झाल्यावर प्रचारी भाषा करण्याची गरजच राहत नाही; पण मावळते राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांच्या उपस्थितीतच त्यांचे प्रशासन भ्रष्ट होते, त्यांच्या सरकारने धोकादायक गुन्हेगारांना अभय दिले, देशातील अभिव्यक्ती स्वातंत्र्य संपवले, काहीजणांनी मला संपवण्याचाच प्रयत्न केला आदी आरोप ट्रम्प यांनी केले. वास्तविक, हे टाळून सकारात्मक सुरुवात करण्याची गरज होती. आपली कारकीर्द संपत असताना बायडेन यांनी केलेल्या निरोपाच्या भाषणात देशातील अतिश्रीमंत लोक आणि 'टेक्नो इंडस्ट्रियल कॉम्प्लेक्स' यांच्यापासून अमेरिकेला धोका असल्याचा इशारा दिला होता. स्वतंत्र वृत्तपत्रे कोसळत आहेत, संपादक गायब होत आहेत आणि समाजमाध्यमे तथ्य तपासणीला फाटा देत आहेत, अशी तिखट टीकाही त्यांनी केली होती.

'टेस्ला' व 'एक्स'चे मालक एलॉन मस्क यांची ट्रम्प यांनी 'डिपार्टमेंट ऑफ गव्हन्मेंट एफिशियन्सी कमिशन'वर नेमणूक केली आहे. मस्क हे आपल्या स्वार्थासाठी सरकारी निर्णयांवर प्रभाव टाकू शकतात, अशी भीती व्यक्त केली जात आहे. ट्रम्प यांनी शपथ घेतल्यानंतर काही मिनिटांतच मस्क यांच्या नेतृत्वाखाली सरकारने जो विभाग निर्माण केला आहे, त्याच्या पारदर्शकतेबद्दल शंका उपस्थित करत, तीन कायदेशीर खटले दाखल झाले आहेत. तिकडे करचुकवेगिरी तसेच बंदुकीच्या प्रकरणात स्वतःच्या मुलावर जे गुन्हे दाखल करण्यात आले होते, त्यामधून राष्ट्राध्यक्षाच्या अधिकारात बायडेन यांनी पायउतार होण्यापूर्वी, त्याला माफी देऊन टाकली! २०२० मधील निवडणुकीत बायडेन यांच्याकडून पराभव झाल्यानंतर ट्रम्प समर्थकांनी गोंधळ घातला होता. यावेळी राष्ट्राध्यक्ष होताच या दंगलखोरांना ट्रम्प यांनी माफी देऊन टाकली आहे. राष्ट्राध्यक्षाने कुटुंबाचा व समर्थकांचा विचार करून चालत नाही; पण अमेरिकेत नेमके तेच घडत आहे. मुळात बायडेन यांना डेमॉक्रॅटिक पक्षाने जाहीर केलेली उमेदवारी मागे घ्यायला लावल्यामुळे ते आपल्याच पक्षाबद्दल नाराज होते. आपण शर्यतीत असतो, तर ट्रम्प यांचा पराभव केला असता, असे त्यांना वाटत होते; मात्र बायडेन यांनी आपल्या पक्षातील जहाल गटास अधिक वाव दिल्यामुळे अमेरिकेत स्थलांतरितांना अमर्यादित घुसखोरी करता आली, हे वास्तव आहे. त्यांच्या कारकिर्दीत प्रचंड महागाई झाली. तसेच डेमॉक्रॅटिक पक्षाचा मुख्य पाठिराखा असलेल्या कामगारवर्गाकडे दुर्लक्ष झाले.

अर्थात, बायडेन राजवटीत उत्पादन व तंत्रज्ञान क्षेत्रांमध्ये देशाने आगेकूच केली; पण बायडेन यांना अफगाणिस्तानातून अमेरिकन सैन्य मागे घ्यावे लागले. तसेच युरोपमधील प्रभाव कमी झाल्यामुळेच रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुतीन युक्रेनवर आक्रमण करू शकले. इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांची गाझापट्टीतील बॉम्बफेक ते थांबवू शकले नाहीत. त्यांना यश मिळाले, ते गेल्या आठवड्यात; पण तोवर प्रचंड नरसंहार होऊन गेला होता. आता गाझा ही पुन्हा संघर्षभूमी होणार नाही, याची दक्षता ट्रम्प यांना घ्यावी लागेल. अर्थात, बायडेन यांनी भारताशी संबंध अधिक मजबूत केले. अमेरिका-मेक्सिको सीमेवर ट्रम्प हे राष्ट्रीय आणीबाणी जाहीर करून, तेथील घुसखोरी पूर्णपणे थांबवणार आहेत. पहिल्या टर्ममध्ये त्यांना याबाबत यश आले नव्हते. दोन्ही देशांत भिंत बांधण्याची त्यांची घोषणा हवेतच विरली होती. बेकायदा गुन्हेगारी टोळ्यांना ते दहशतवादी संघटना म्हणून घोषित करणार आहेत. पश्चिम अमेरिकेतील वंशवादी उजव्या दहशतवाद्यांचा ते बंदोबस्त करतील, अशी अपेक्षा आहे. सरकार तेल व वायूचे अधिकाधिक उत्खनन करणार असून, त्यासाठी ट्रम्प यांना संबंधित कंपन्यांना कर सवलतीही द्याव्या लागतील. ते राष्ट्रीय ऊर्जा आणीबाणी जाहीर करणार आहेत. देशाचा अधिक विकास करून रोजगार देण्यासाठी ते वाढत्या कर्ब उत्सर्जनाची कितपत काळजी करतील, अशी सार्थ भीती व्यक्त केली जाते.

नागरिकांना श्रीमंत करण्यासाठी अन्य देशांवर कर लादणार आहोत, असेही ट्रम्प यांनी घोषित केले; मात्र सर्वच देशांनी असे धोरण आखल्यास जागतिकीकरणाच्या घड्याळाचे काटे उलटे फिरण्याची प्रक्रिया सुरू होईल. पनामा कालवा परत घेणार असल्याच्या निर्धाराचा ट्रम्प यांनी पुनरुच्चार केला. कालव्याचे कामकाज चीनकडून चालवले जाते, तर अमेरिकी जहाजांवर प्रचंड शुल्क आकारले जाते. आम्ही हा कालवा चीनला नव्हे, तर पनामाला दिला होता. तो आम्ही परत घेत आहोत, असे ट्रम्प यांनी एकतर्फी जाहीर केले. यामधून चीन-अमेरिकेतील संघर्ष वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. बाजारपेठेत येणार्या विदेशी वस्तूंवर मोठ्या प्रमाणात आयात कर लावण्याचे ट्रम्प यांनी वारंवार घोषित केले असून, त्याचा सर्वच देशांना फटका बसू शकतो. भारतीय लोक उच्च शिक्षण प्राप्त करून चिकाटीने अमेरिकेत यशस्वीपणे नोकरी-व्यवसाय करत आहेत. याउलट अन्य देशांतील लोक अवैध पद्धतीने येत आहेत. त्यामुळे सीमा सुरक्षेबाबत कडक धोरण राबवणारे आणि अमेरिकेचा गतिमान विकास करू पाहणारे ट्रम्प, भारतीयांना जवळचे वाटत आहेत. अमेरिकेने एच१बी व्हिसा धोरणात स्वागतार्ह बदल केले असून, त्याचा भारतीय नागरिकांना फायदाच होणार आहे. पहिल्या पर्वातील चुका टाळून ट्रम्प यांनी अधिक जबाबदारीने व प्रगल्भपणे कारभार हाकल्यास अमेरिका व भारत दोघांच्याही हिताचे ठरेल. ते कसे ते लवकरच स्पष्ट होईल.

# देशांतर्गत पातळीवर सुरक्षेशी आव्हाने

देशांतर्गत पातळीवर राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित काही आव्हाने नव्या काळात उभी राहिली आहेत. मणिपूरमध्ये सतत अस्वस्थता राहिली आहे. त्याचवेळी नक्षलग्रस्त भागात सुरक्षा दलाला मिळालेले यश समाधानकारक असले, तरी नक्षलवादाचा धोका कायम आहे. या पार्श्वभूमीवर विकसनशील भारताच्या सीमेची सुरक्षा आणि देशांतर्गत शांतता ठेवण्याची मोठी जबाबदारी संरक्षण मंत्रालयावर आहे.संरक्षणमंत्र्यांनी विविध आघाड्यांवरच्या आव्हानांचा मुकाबला करण्यासाठी यावर्षी सुधारणांचे वर्ष म्हणून जाहीर केले आहे. नव्या घोषणेनुसार देशाच्या बहुविध सुरक्षेसाठी दोन किंवा तीन थिएटर कमांड तयार करून पाणी, जमीन आणि नभ (अवकाशही) हे सर्व स्रोत एकाच कमांडर किंवा थिएटर प्रमुखांकडे सोपवण्याची योजना आहे. २०२४ वर्ष मावळले; पण रशिया आणि युद्धाची दाहकता अजूनही शमलेली नाही. अनेक ठिकाणी दहशतवाद फैलावण्याची आणि नैतिक ह्रासाची चिन्हे दिसत आहेत. अमेरिकेसह अनेक देशांत दहशतवाद्यांच्या आत्मघातकी हल्ल्यामुळे हाहाकार माजत आहे. अर्थात, गेल्यावर्षी सुदैवाने अपेक्षेपेक्षा भारत शत्रू देशांच्या उघडपणे होणार्या हल्ल्याला बळी पडला नाही आणि चीनलगतच्या प्रत्यक्ष ताबा रेषेवर काही प्रमाणात तणाव कमी दिसून आला. पाकिस्तान आणि बांगला देशच्या नव्या प्रशासनाशी जवळीकता असतानाही ईशान्येकडील सीमेवर युद्धजन्य स्थिती नसेल; पण तेथील स्वातंत्र्याचे मूल्य हे सतत संरक्षणातूनच जपले जाते, हे भारत विसरलेला नाही. देशांतर्गत स्थितीचा आढावा घ्यायचा झाल्यास मणिपूरमध्ये सतत अस्वस्थता राहिली आहे. त्याचवेळी नक्षलग्रस्त भागात सुरक्षा दलाला मिळालेले यश समाधानकारक आहे. या पार्श्वभूमीवर विकसनशील भारताच्या सीमेची सुरक्षा आणि देशांतर्गत शांतता ठेवण्याची मोठी जबाबदारी संरक्षण मंत्रालयावर आहे. संरक्षण मंत्र्यांनी विविध आघाड्यांवरच्या आव्हानांचा मुकाबला करण्यासाठी यावर्षी सुधारणांचे वर्ष म्हणून जाहीर केले आहे. त्यांनी लष्कर आणि त्याचे सहायक घटक तसेच संस्थांतील सुधारणा नवीन वर्षात पूर्ण करण्याचे संभाव्य ध्येय निश्चित केले. संरक्षण मंत्रालयाचे व्यापक उद्देश दोन प्रकारचे आहे. पहिल्या श्रेणीतील सुधारणा ही देशातील नागरिकांना ठाऊक असून या सुधारणा आणि त्याचे परिणाम हे देशाच्या आर्थिक विकासाशी स्पष्टपणे जोडले गेलेले आहेत. उदाहरणार्थ, संरक्षण सज्जतेसाठी साधनसामग्री आणि नावीन्यपूर्ण शस्त्रांची निर्मिती करणे, खरेदी आणि ताबा प्रक्रिया सुलभ भरणे, प्रभावशाली आणि वेग आणणार्या रचनात्मक सुधारणा, भारतीय हवाई दलात लढाऊ विमानांचा ताफा वाढविणे. कारण सध्याच्या निश्चित ४५ स्क्वाड्रनपेक्षा खूप कमी संख्या आहे. एवढेच नाही तर राफेलसारख्या आधुनिक विमानांची जुळवणी करताना १७ वर्षे लागली. आता तिन्ही दलांच्या लष्करासाठी अत्याधुनिक शस्त्रे मिळवण्याची प्रक्रिया एवढी पूर्वीइतकी गुंतागुंतीची राहिलेली नाही. म्हणून आण्विक पाणबुड्यांसारखी खरेदी किंवा आकाशातील सुरक्षेसाठी (एअर डिफेन्स) अत्याधुनिक प्रणाली खरेदी करण्याचे अवघड काम आणि महागडी प्रक्रिया तुलनेने सोपी आणि सुलभ केलेली आहे. दुसरे क्षेत्र त्यात सुधारणांची गरज सर्वमान्यच वाटते आणि ती म्हणजे युद्धशास्त्राचे नवे तंत्रज्ञान आणि पद्धत. शास्त्रीय प्रगतीमुळे युद्धाची पारंपरिक प्रतिमेत अभूतपूर्व बदल होत आहे. पारंपरिक तोफगोळ्यांच्या मदतीने लढल्या जाणार्या युद्धाची जागा आता सायबर युद्ध आणि मानसशास्त्रीय युद्धाने घेतली आहे.एआय, रोबोटिक्स, मशिन लर्निंग, हायपर सॉनिकसारख्या नव्या तंत्रज्ञान युद्धकलेत अनाकलनीय बदल होत आहेत. या सर्वच क्षेत्रांत संरक्षण मंत्रालय नक्कीच पाऊल उचलेल. याप्रमाणे भविष्यातील युद्ध जमिनीची मर्यादा ओलांडत अवकाशात लढले जाईल. म्हणून अवकाशात उपग्रहांच्या डॉकिंगचा (सोबत घेणे) प्रयोग यशस्वी होताच भारत हा अमेरिका, रशिया आणि चीनसमवेत चौथी अवकाश शक्ती होईल. अवकाशातील यशाबरोबरच देशातील संरक्षण तंत्र आणखी सबळ होण्याच्या दृष्टीने नवीन पाऊल उचलण्याचे संरक्षण मंत्रालयाचे आवाहन हे खरोखरीच प्रशंसनीय आहे. याप्रमाणे संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेच्या महत्त्वाच्या योगदानाला आणखी सुदृढ करण्यासाठी संरक्षण उत्पादनातील सरकारी तंत्राला खासगी क्षेत्रातील उपक्रम आणि संघटनेला जोडणार्या सुधारणा सर्वांनाच आवश्यक वाटत आहेत.संरक्षण मंत्र्यांच्या घोषणेतील सर्वात महत्त्वाच्या सुधारणांपासून देश अपरिचित राहिलेला आहे. ती म्हणजे देशाच्या सशस्त्र दलाला एकीकृत करणारे सैन्य कमांड प्रणाली स्थापन करण्याच्या दिशेने टाकले जाणारे पाऊल. सध्या तिन्ही दल हे देशाच्या भौगोलिक रचनेनुसार विविध तुकड्यात, कमांडमध्ये विभागलेल्या आहेत. उदा. लष्कर आणि हवाई दलाचे पूर्व, पश्चिम, उत्तर, दक्षिण आणि केंद्रीय कमांड. विविध भौगोलिक क्षेत्रातील स्रोतांचा वापर करत लष्कर संबंधित क्षेत्राच्या सुरक्षेसाठी जबाबदार आहे. याशिवाय हवाई दलात मेटेनन्स कमांड आणि स्थल, प्रशिक्षण कमांड देखील आहे. मात्र नव्या घोषणेनुसार देशाच्या बहुविविध सुरक्षेसाठी दोन किंवा तीन थिएटर कमांड तयार करून पाणी, जमीन आणि नभ (हे सर्व स्रोत एकाच कमांडर किंवा थिएटर प्रमुखांकडे सोपवण्याची योजना आहे. या नव्या धोरणाची घोषणा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १५ ऑगस्ट २०१९ मध्ये केली. पुढील वर्षी सरसेनाध्यक्ष जनरल बिपीन रावत यांची नियुक्तिदेखील करण्यात आली. परंतु त्यांचा अपघाती मृत्यू झाल्यानंतर या योजनेच्या अंमलबजावणीच्या हालचाली दिसल्या नाहीत. सैन्य तज्ज्ञांत देखील या विषयावर सर्वसंमती होऊ शकली नाही. काहींच्या मते, मर्यादित स्रोतांचा चांगल्यारीतीने करता येईल आणि युद्ध काळात तातडीने निर्णय आणि अंमलबजावणी करण्यास मदत मिळेल.

# तेजतर्रार रणरागिणींचा

आयर्लंडविरुद्ध ३ सामन्यांची मालिका ३-० अशा एकतर्फी फरकाने जिंकत असताना भारताच्या रणरागिणींनी जो आवेशपूर्ण खेळ साकारला, त्याला तोड नाही. फलंदाजी, गोलंदाजी व क्षेत्ररक्षण या तिन्ही आघाड्यांवर उत्तम वरचष्मा गाजवताना भारतीय महिला क्रिकेटपटूंनी एकीकडे संघ एकजिनसी असल्याचा उत्तम दाखला तर दिलाच शिवाय जागतिक क्रिकेटवरील आपली मजबूत पकड आणखी अधोरेखित केली. आपल्याला जागतिक क्रिकेटमध्ये तेजतर्रार रणरागिणी असे का संबोधले जाते, याचेच अलगद उमटलेले हे अवीट प्रतिबिंब!

ांतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये प्रथमच ४०० पारचा भीम पराक्रम, अवघ्या ७० चेंडूंतील स्मृती मानधनाचे तडफदार शतक, प्रतीका रावलची महिला वन डेमध्ये एकाच डावात १५० हून अधिक धावांची आतषबाजी, महिला वन डे क्रिकेटमध्ये २०० हून अधिक धावांची विक्रमी सलामी, एकाच डावात ४८ चौकार, ९ षटकारांची आतषबाजी आणि इतके कमी की काय म्हणून वन डे क्रिकेटमधील सर्वोच्च ३०४ धावांनी मिळवलेला एकतर्फी विजय! एखाद्या स्क्रीप्टमध्येही येणार नाही, इतक्या विक्रमांची ही बरसात इतके सांगण्यासाठी पुरेशा आहेत की, भारतीय महिला संघाची वाटचाल अतिशय योग्य ट्रॅकवर होत आहे!

सुरुवातीलाच प्रतिस्पर्ध्याला गौरवणे, याचे प्रशिक्षण कुठेही मिळत नाही. पण, तो गुणही भारतीय रणरागिणींनी या मालिकेत दाखवला. विजयश्रीवर शिक्कामोर्तब केल्यानंतर भारतीय रणरागिणींच्या चेहर्यावर अवश्य त्याचा आनंद झळकला; पण त्या विजयश्रीच्या आनंदालादेखील नम्रतेची झालर होती, प्रतिस्पर्ध्याबद्दलचा आदर होता, खेळातील चढउताराची प्रगल्भ जाणीव होती. भारतीय महिला संघ आता वन डे क्रिकेटमधील आपली पुढील मालिका जुलैमध्ये इंग्लंडविरुद्ध खेळेल. त्या मालिकेला बराच अवकाश आहे; पण त्या मालिकेत उतरतानाही त्यांचे खरे लक्ष्य आयसीसी विश्वचषक जिंकण्यासाठी पूर्वतयारी करणे हेच असेल, हे ओघानेच आले.

या विजयातील एक मुख्य शिल्पकार असणारी, चौफेर फटकेबाजी करत सहज शतकापार पोहोचणारी प्रतीका आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये अगदीच नवखी; पण तिने प्रत्येक चेंडूवर तुटून पडण्याचे जे बुलंद




इरादे प्रत्यक्षात साकारण्याची धमक दाखवली, ती नि:संदेह स्पृहणीय! प्रतीकाच्या उमद्या प्रारंभाची झलक यावरूनच यावी की, तिने आंतरराष्ट्रीय पदार्पण केल्यानंतर पहिल्या ६ डावांतच थोड्याथोडक्या नव्हे, तर ४४४ धावांची आतषबाजी केली आणि तीही ७४ च्या तडाखेबंद सरासरीने! (दक्षिण आफ्रिकेच्या मलानचा अपवाद वगळला, तर आंतरराष्ट्रीय पुरुष व महिला क्रिकेटमध्ये आणखी कोणालाही असा भीम पराक्रम गाजवता आलेला नाही). अवघ्या १२९ चेंडूंत १५४ धावा कुटणार्या प्रतीकाने सहकारी सलामीवीर स्मृती मानधनासह २३३ धावांची सलामी दिली, तोही आणखी एक उत्तुंग विक्रमच!

आश्चर्य म्हणजे, आयर्लंडविरुद्ध प्रत्येक चेंडूवर तुटून पडण्यासाठी प्रयत्नशील असणारी स्मृती मानधना येथे नियमित कर्णधार हरमनप्रीत कौरच्या गैरहजेरीत संघाच्या नेतृत्वाची धुराही कसोशीने सांभाळत होती. प्रतीकाची फलंदाजी अगदी जवळून पाहणार्या स्मृतीने तिसर्या सामन्यानंतर तिच्यावर स्तुतिसुमने उधळली नसती, तरच नवल होते! स्मृती ओघातच बोलून गेली, 'संयम आणि आक्रमणाचा इतका सुंदर मिलाफ मी आजवर कुठेच पाहिलेला नाही! प्रतीका एखादा चेंडू बॅटीच्या तडाख्याने थेट स्टेडियमवर भिरकावून देईल आणि त्यानंतर लगेच पुढील चेंडूवर आवश्यकता असेल, तर अगदी बचावात्मक फटकादेखील तितकाच तोडीस तोड खेळेल!'

ज्याप्रमाणे स्मृती मानधना, प्रतीका रावल यांनी तडफ दाखवली, तोच कित्ता अन्य संघ सहकार्यांनीही गिरवला आणि त्याचमुळे ही विजयी घोडदौड विशेष लक्षवेधी ठरली. दीप्ती शर्मा, तनुजा कनवर, मिन्नू यांची भेदक फिरकी खेळणे भल्याभल्यांना शक्य होत नाही, ही संघाची मजबुतीच. याशिवाय, जेमिमा रॉड्रिग्यूज, हरलीन, सायमा, सायली, रिचा घोष या बिनीच्या शिलेदारांचा वाटाही तितकाच महत्त्वपूर्ण, तितकाच लक्षवेधी! तेजतर्रार रणरागिणींचा हा पराक्रम त्यामुळेच विशेष महत्त्वाचा!

# स्वातंत्र्य लढयातील धाडसी नेता : सुभाषचंद्र बोस

महात्मा गांधी आणि भारतीय राष्ट्रीय काँग्रेस यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय चळवळीत सामील होण्यासाठी सुभाषचंद्र बोस १९२१ मध्ये इंग्लंड वरुन भारतात परत आले. बोस हे जवाहरलाल नेहरु यांचे नेतृत्व असलेल्या गटात गेले. हा गट घटनात्मक सुधारणेसाठी कमी उत्सुक होता आणि समाजवादासाठी अधिक खुला होता. १९३८ मध्ये ते काँग्रेसचे अध्यक्ष झाले, १९३९ मध्ये पुन्हा निवडून आले पण पुढे त्यांच्यात आणि महात्मा गांधीमध्ये मतभेद झाले. काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांनी गांधींना पाठिंबा दिला. त्यानंतर बोस यांनी अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. १९२१ साली इंग्लंडला जाऊन सुभाष भारतीय नागरी सेवेच्या परीक्षेत उत्तीर्ण झाले. परंतु इंग्रज सरकारची चाकरी करण्यास नकार देऊन त्यांनी राजीनामा दिला व ते मायदेशी परतले. कोलकात्यातील ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक, देशबंधू चित्तरंजन दास ह्यांच्या कार्याने प्रभावित झालेल्या सुभाषची दासबाबूंबरोबर काम करण्याची इच्छा होती. इंग्लंडहून त्यांनी दासबाबूंना पत्र लिहून त्यांच्याबरोबर काम करण्याची इच्छा व्यक्त केली होती. रविंन्द्रनाथ ठाकूर ह्यांच्या सल्ल्यानुसार भारतात परतल्यानंतर ते सर्वप्रथम मुंबईला जाऊन महात्मा गांधींना भेटले. मुंबईत गांधीजी मणिभवन नामक वास्तु मध्ये वास्तव्य करत. तेथे २० जूलै १९२१ रोजी महात्मा गांधी आणि सुभाषचंद्र बोस सर्वप्रथम एकमेकांना भेटले. गांधीजींनी देखिल कोलकात्याला जाऊन दासबाबूंबरोबर काम करण्याचा सल्ला दिला. मग सुभाषबाबू कोलकात्यालाआले व दासबाबूंना भेटले. दासबाबूंना त्यांना पाहून फार आनंद झाला. त्याकाळी गांधीजींनी इंग्रज सरकारच्या विरोधात असहकार आंदोलन चालवले होते. दासबाबू बंगालमध्ये हया आंदोलनाचे नेतृत्व करत होते. त्यांच्याबरोबर सुभाषबाबू ह्या आंदोलनात सहभागी झाले.

१९२२ साली दासबाबूंनी काँग्रेस अंतर्गत स्वराज पक्षाची स्थापना केली. विधानसभेच्या आतून इंग्रज सरकारला विरोध करण्यासाठी कोलकाता महापालिकेची निवडणूक स्वराज पक्षाने लढवून जिंकली आणि स्वतः दासबाबू कोलकात्याचे महापौर झाले. त्यांनी सुभाषबाबूंना महापालिकेचे प्रमुख कार्यकारी अधिकारी बनवले. सुभाषबाबूंनी आपल्या कार्यकाळात महापालिकेची काम करण्याची पद्धतच बदलून टाकली. कोलकात्यातील रस्त्यांची इंग्रज नावे बदलून त्यांना भारतीय नावे दिली गेली. स्वातंत्र्य लढ्यात प्राणार्पण केलेल्या क्रांतिकारकांच्या कुटुंबीयांना महापालिकेत नोकरी मिळू लागली. लवकरच सुभाषबाबू देशातील एक अग्रेसर युवा नेता म्हणून ओळखले जाऊ लागले. पंडित जवाहरलाल नेहरुंसह सुभाषबाबूंनी काँग्रेस अंतर्गत इंडिपेंडन्स लिगची स्थापना केली. १९२८ साली जेव्हा सायमन कमिशन भारतात आले तेव्हा काँग्रेसने त्याला काळे झेंडे दाखवले होते.



कोलकात्यात सुभाषबाबूंनी ह्या आंदोलनाचे नेतृत्व केले. सायमन कमिशनला उत्तर देण्यासाठी काँग्रेसने भारताच्या भावी घटनेचा आराखडा तयार करण्यासाठी आठ सदस्यांची समिती नेमली. पंडित मोतीलाल नेहरुं ह्या समितीचे अध्यक्ष होते तर सुभाषबाबू त्याचे एक सदस्य. ह्या समितीने नेहरु रिपोर्ट सादर केला.

१९२८ साली काँग्रेसचे वार्षिक अधिवेशन पंडित मोतीलाल नेहरुंच्या अध्यक्षतेखाली कोलकात्यात झाले. ह्या अधिवेशनात सुभाषबाबूंनी खाकी गणवेश घालून पंडित मोतीलाल नेहरुंना लष्करी पद्धतीने सलामी दिली. गांधीजी त्याकाळी पूर्ण स्वराज्याच्या भूमिकेशी सहमत नव्हते. ह्या अधिवेशनात त्यांनी इंग्रज सरकारकडून वसाहतीचे स्वराज्य मागण्यासाठी ठराव मांडला होता. मात्र सुभाषबाबू व पंडित जवाहरलाल नेहरु ह्यांना पूर्ण स्वराज्याच्या भूमिकेशी तडजोड मान्य नव्हती. अखेर वसाहतीचे स्वराज्याची मागणी मान्य करण्यासाठी इंग्रज सरकारला एक वर्षाची मुदत देत एका वर्षात इंग्रज सरकारने ही मागणी मान्य केली नाही तर काँग्रेस पूर्ण स्वराज्याची मागणी करेल असे ठरले. इंग्रज सरकारने ही मागणी मान्य केली नाही, त्यामुळे १९३० साली काँग्रेसचे वार्षिक अधिवेशन पंडित जवाहरलाल नेहरुंच्या अध्यक्षतेखाली लाहोरला झाले, तेव्हा असे ठरवले गेले की २६ जानेवारी हा दिवस 'स्वातंत्र्यदिन' म्हणून पाळला जाईल.

२६ जानेवारी १९३१ च्या दिवशी कोलकात्यात सुभाषबाबू तिरंगी ध्वज फडकावत एका विराट मोर्चाचे नेतृत्व करत होते. तेव्हा पोलिसांनी केलेल्या लाठीहल्ल्यात ते जखमी झाले. सुभाषबाबू तुरूंगात असताना गांधीजींनी इंग्रज सरकारबरोबर तह केला व सर्व कैद्यांची सुटका करण्यात आली. परंतु सरदार भगतसिंग आदि क्रांतिकारकांची सुटका करण्यास इंग्रज सरकारने नकार दिला. भगतसिंगांची फाशी रद्द करावी ही मागणी गांधीजींनी इंग्रज सरकारकडे केली. सुभाषबाबूंची इच्छा होती की ह्या बाबतीत इंग्रज सरकार जर दाद देत नसेल, तर गांधीजींनी सरकारबरोबर केलेला करार मोडावा. पण आपल्या बाजूने दिलेला शब्द मोडणे गांधीजीना मान्य नव्हते. इंग्रज सरकारने आपली भूमिका सोडली नाही व भगतसिंग आणि त्यांच्या साथीदारांना फाशी देण्यात आले. भगतसिंगांना वाचवू न शकल्यामुळे सुभाषबाबू गांधीजी व काँग्रेसच्या कार्यपद्धतीवर फार नाराज झाले. २२ जुलै १९४० रोजी मुंबई येथे सुभाषचंद्र बोसांची डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचेशी भेट झाली. दोघांमध्ये देशाचे स्वातंत्र्य आणि देशातील जातीयता व अस्पृश्यता यावर चर्चा झाली.

भारतीय राष्ट्रवादाचे मुख्य साधन असलेल्या भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने बोस यांच्या देशभक्तीची नेहमीच प्रशंसा केली, परंतु त्यांच्या रणनीती आणि विचारसरणीपासून स्वतःला दूर केले. ब्रिटिशांची राजवट आझाद हिंद सेनेमुळे कधीही धोक्यात आली नाही. ब्रिटिशांनी आझाद हिंद सेनेच्या ३०० अधिकाऱ्यांवर देशद्रोहाचा आरोप लावला, पण अखेरीस काँग्रेसच्या विरोधामुळे ब्रिटिश मागे सरले. भारतातील अनेकांसाठी ते एक नायक आहेत. पण हुकूमशाही जपान आणि जर्मनीसोबत त्यांचे जाणे, हे टीकेचे एक कारण होते. जर्मनीच्या सर्वात वाईट अतिरेकांवर आणि त्यांच्या अमानुष अत्यांचारावर जाहीरपणे टीका करण्याचे त्यांनी टाळले. तसेच पीडितांना भारतात आश्रय देण्याचीही अनिच्छा दर्शवली. पण हे सर्व जागरूकतेच्या अभावामुळे घडले असेही म्हणता येणार नाही. वयाच्या १५ व्या वर्षी सुभाष गुरूच्या शोधात हिमालयात गेले हाते. गुरूचा हा शोध असफल राहिला. त्यानंतर स्वामी विवेकानंदांचे साहित्य वाचून, सुभाष त्यांचे शिष्य बनले. महाविद्यालयात शिकत असताना अन्यायाविरूद्ध लढण्याची त्यांची प्रवृत्ती झाली.

सुभाषचंद्र बोस हे भारतीय स्वातंत्र्य लढयातील एक अग्रेसर नेते होते. नेताजी असे त्यांना प्रथम १९४२ च्या सुरुवातीस जर्मनीमध्ये भारतीय सैनिकांनी आणि बर्लिनमधील भारताच्या विशेष ब्यूरोमधील जर्मन आणि भारतीय अधिकाऱ्यांनी म्हणायला सुरू केले होते. आता संपूर्ण भारतात त्यांना नेताजी म्हटले जाते. एडॉल्फ हिटलरने मे १९४२ च्या उत्तरार्धात बोस यांच्याशी झालेल्या एकमेव भेटीत पाणबुडीची व्यवस्था करण्याची ऑफर दिली. बोस एका जर्मन पाणबुडीवर चढले. त्यांची एका जपानी पाणबुडीत बदली करण्यात आली जिथून ते मे १९४३ मध्ये जपानच्या ताब्यातील सुमात्रा येथे उतरले. जपानच्या पाठिंब्याने बोस यांनी आझाद हिंद सेनेमध्ये सुधारणा केली, ज्यात ब्रिटिश भारतीय सैन्याच्या युद्धातील भारतीय कैद्यांचा समावेश होता. जपान-व्याप्त अंदमान आणि निकोबार बेटांवर भारताचे तात्पुरते सरकार घोषित करण्यात आले आणि जपानने त्याचे प्रमुखपद बोस यांना दिले. जरी बोस असामान्य आणि प्रतिभाशाली होते, तरी जपानी लोक त्यांना लष्करीदृष्ट्या अकुशल मानत होते तसेच त्यांचा सैनिकी प्रयत्न अल्पकाळच टिकला. १९४४ च्या उत्तरार्धात आणि १९४५ च्या सुरुवातीस ब्रिटिश भारतीय सैन्याने भारतावरील जपानी हल्ला परतवून लावला. यामध्ये जवळजवळ अर्धे जपानी सैन्य आणि जपानसोबत सहभागी असलेल्या आझाद हिंद सेनेची तुकडी बळी गेली. यानंतर बोस हे सोव्हिएत युनियनमध्ये भविष्य शोधण्यासाठी मंचुरियाला गेले.

१९२५ साली गोपीनाथ साहा नामक एक क्रांतिकारी कोलकात्याचे पोलीस अधीक्षक चार्लस टेगार्ट ह्यांना मारण्याच्या प्रयत्नांत होता. पण त्याने चुकून अर्नेस्ट डे नामक एका व्यापारी इसमाला मारले. ह्यासाठी त्याला फाशीची शिक्षा सुनावली गेली. गोपीनाथ फाशी गेल्यावर सुभाषबाबू जाहीरपणे जोरात रडले. त्यांनी गोपीनाथचा पार्थिव देह मागून घेऊन त्याच्यावर अंत्यसंस्कार केले. ह्यावरून इंग्रज सरकारने अर्थ लावला की सुभाषबाबू ज्वलंत क्रांतिकारकांशी संबंध तर ठेवतातच, परंतु तेच ह्या क्रांतिकारकांचे स्फूर्तिस्थान आहेत. ह्या कारणास्तव इंग्रज सरकारने सुभाषबाबूंना अटक केली व कोणताही खटला न चालवताच त्यांना अनिश्चित कालखंडासाठी म्यानमारच्या मंडाले कारागृहात बंदिस्त करून टाकले. ५ नोव्हेंबर १९२५ च्या दिवशी देशबंधू चित्तरंजन दासांचे कोलकाता येथे देहावसान झाले. सुभाषबाबूंनी त्यांच्या मृत्यूची बातमी मंडालेच्या कारागृहात रेडियोवर ऐकली. मंडाले कारागृहातील वास्तव्यात सुभाषबाबूंची तब्येत बिघडली, त्यांना क्षयरोगाने ग्रासले. परंतु इंग्रज सरकारने तरीही त्यांची सुटका करण्यास नकार दिला. सरकारने त्यांची सुटका करण्यासाठी अट घातली की त्यांनी औषधोपारासाठी युरोपला जावे. पण औषधोपचारानंतर ते भारतात कधी परत येऊ शकतात हे सरकारने स्पष्ट केले नाही. त्यामुळे सुभाषबाबूंनी सरकारची अट मानली नाही. अखेर परिस्थिती इतकी कठीण झाली की कदाचित तुरूंगातच सुभाषबाबूंचा मृत्यू ओढवेल असे वाटू लागले. इंग्रज सरकारला हा धोकाही पत्कारायचा नव्हता. त्यामुळे सरकारने अखेर त्यांची सुटका केली. मग सुभाषबाबू औषधोपारासाठी डलहौसी येथे जाऊन राहिले. स्वातंत्र्य लढयातील धाडसी नेता सुभाषचंद्र बोस यांच्या जयंती निमित्त विनम्र अभिवादन !

-------------------

प्रविण बागडे
नागपूर भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९
pravinbagdegmail.com

# समृद्धी महामार्ग आणि शेतकऱ्यांच्या समस्या...

समृद्धी महामार्गाचे अनेक दुष्परिणाम रोजच चर्चेत येत असताना केवळ जलद गतीच्या नावावर पुन्हा महाराष्ट्रात समृद्धी महामार्गाचे जाळे पसरण्याचा सरकारने प्रयत्न चालविला आहे. त्याची सुरुवात शक्तिपीठ महामार्गापासून सुरू झाली आहे . पण शक्तीपीठ महामार्गाला शेतकऱ्यांनी कडाडून विरोध केला आहे . विरोधाचा हा वनवा संपूर्ण महाराष्ट्रात पेटला असून भंडारा जिल्ह्यात त्याचे तीव्र पडसाद उमटले आहेत. जिल्हाभर शेतकऱ्यांनी तीव्र आंदोलन छेडले असून अनेक आरोप केले आहेत. भंडारा गडचिरोली आसा महामार्ग काढून प्रवासाचे अंतर कमी करण्याची सरकारची योजना असली तरी, या योजनेला शेतकरी बांधवांनी सर्वत्र नापसंती दर्शवून निषेध नोंदविला आहे .संबंधित विभागाने जमीन हस्तांतरित करण्यासाठी कारवाई सुरू केली आहे. मात्र या शेतकऱ्यांची जमीन अधिग्रहित करण्यापूर्वी शेतजमिनीची किंमत किती मिळणार? हे अजूनही शेतकऱ्यांना कळविण्यात आले नाही. त्यामुळे शेतकरी संभ्रमात आहेत. शासनाने बळजबरीने शेतीची मोजणी केल्याचा आरोपही शेतकऱ्यांनी केला आहे. १६ जानेवारीला शेतकऱ्यांनी शेती मोजणी करिता शेतावर हजर राहावे अन्यथा पुनर मोजणीचे पैसे शेतकऱ्यांकडून वसूल केले जातील असे पत्र शेतकऱ्यांना देण्यात आल्याचे बोलले जाते. यामुळे सर्वत्र शेतकऱ्यांमध्ये संतापाची लाट पाहायला मिळते . पूर्व विदर्भात भंडारा ते गडचिरोली महामार्ग तयार करण्यासाठी अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी रस्त्यात जाणार आहेत . भंडारा जिल्ह्यात गोसे प्रकल्प, इटियाडोह प्रकल्प( गोठणगाव ) , हे मोठे धरण आहेत. त्यामुळे येथे अनेक पिके घेतली जातात धान ( भात ) हे भंडारा जिल्ह्याचे प्रमुख पीक मानले जाते . पण त्यामुळेच शेती आणि त्यावर अवलंबून असलेला शेतमजूर यांच्यावर फार मोठे संकट कोसळणार आहे . जमिनीच्या तुकडीकरणामुळे शेतकरी अल्पभूधारक झाला आहे. अशात हा महामार्ग गेल्यास येथील अनेक शेतकरी भूमिहीन होऊन बेकार होणार आहेत. एखादा विकास आणायचा असेल तर त्यासाठी काही गमवावे लागते. समृद्धी महामार्गाला सरकार आणि पगारदार, नोकरदार किंवा भांडवलदार विकास समजत असतील ,पण अनेक लोक त्यात विस्थापित होऊन त्यांच्या कामधंद्याला कुलूप लागत असेल तर समृद्धी महामार्ग कोणाचा विकास साधतआहे याचे उत्तर अपेक्षित आहे . शेतकरी शेतमजूर हा सरकारी योजनेत कायम भरडला जातो, हे आजपर्यंतचे वास्तव आहे .यापूर्वी झालेले समृद्धी महामार्ग स्थानिक लोकांना उद्योग धंदे देऊ शकले नाही. हे मार्ग अनेक अपघातांचे, समस्यांचे कारण ठरले आहेत . भंडारा गडचिरोली महामार्ग तयार करताना शेतकऱ्यांशी सरकारने सुसंवाद साधने गरजेचे आहे. शेतकऱ्यांची बाजू समजून घेणे गरजेचे आहे . ही जमीन सुपीक आहे म्हणून शेतकऱ्यांनी ती बॅगेत भरून दुसरीकडे नेता येणार नाही . पण या जमिनीने येथील शेतकऱ्यांच्या शेतमजुरांच्या अनेक पिढ्या पोसल्या आहेत, ही मातीतील माणसं आपल्याच मातीशील तुटणार आहेत. सरकारने पगारदारांचे पगार वाढवले. औषधांचे दर वाढवले .आणि अनेक कर लादले. खतांचे भाव शेती उपयोगी औषधांचे भाव वाढवले. त्याच टक्केवारीत शेतकऱ्यांनी पिकविलेल्या पिकांचे भाव वाढले नाहीत .महागाई वाढली तशी कष्टकऱ्यांची ,शेतमजुरांची ,मजुरी वाढली नाही. त्यामुळे शेतकरी शेतमजूर आणि कष्टकरी यांच्यात प्रचंड आर्थिक दरी निर्माण झाली आहे. त्यातूनच शेतकऱ्यांना नैराश्य आले . त्या नैराश्यातून अनेक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्यात. देशाचा, जगाचा पोशिंदा असा गळून पडला ,आत्महत्या करीत सुटला तर सरकारचे धोरण निश्चितच शेतकरी कैवाराचे नाही .आणि आता विकासाच्या नावावर देशभरात सिमेंट रस्त्यांचे जाळे पसरत चालले आहेत. देश जोडणीच्या कामात हे रस्त्यांचे जाळे असल्यामुळे त्याला एका बाजूने समर्थन द्यावेच लागेल .पण यामुळे भूमिहीन होणाऱ्या शेतकऱ्यांचे काय? हा प्रश्न उरतोच .भंडारा, गडचिरोली, गोंदिया हे जिल्हे भाताचे जिल्हे म्हणून ओळखले जातात. आणि आता हा रोजगार महामार्गाने हिरावला जाणार आहे. तेव्हा येथील शेतकऱ्यांचे आर्थिक पुनर्वसन होणे आवश्यक आहे .त्यांच्या मुलांना मोफत शिक्षण दिले पाहिजे . नोकरीत सामावून घेतले पाहिजे . शक्य झाल्यास त्यांना दुसरीकडे कसदार जमीन दिली पाहिजे .नाहीतर आधीच वाऱ्यावर असलेला येथील शेतकरी ,कष्टकरी, आणि शेतमजूर मोठ्या आर्थिक संकटात सापडेल. आणि सरकार विकासाचे ढोल पिटत राहील. हा चुकीचा संदेश जाता कामा नये. म्हणून शेतकऱ्यांच्या समस्यांना सरकारने समजून घेणे खूप गरजेचे आहे. भंडारा जिल्ह्यात बहुसंख्य शेतकरी हा ओबीसी, तेली ,कुणबी माळी आहे. या समाज बांधवांवर, त्यांच्या उत्पादन साधनावर अशी कुऱ्हाड चालवण्यापूर्वी सरकारने त्यांच्या समस्यांची सोडवणूक करावी अशी रास्ता पेक्षा येथील शेतकरी शेतमजूर कष्टकरी करीत आहेत. आणि ही त्यांची मागणी वास्तवाला धरून आहे. तेव्हा सरकारने त्याचा विचार करायलाच हवा



राजू बोरकर
मु .पो. ता. लाखांदूर
जि. भंडारा
७५०७०२५४६७

# नेताजी सुभाषचंद्र बोस भारताचे तेजोमय क्रांतीकारी योध्दा.

भारत स्वातंत्र्य करण्यासाठी देशात दोन नद्यांचा उगम झाला.एक मवाळवादी तर दुसरी जहालवालवादी यांच्या संगमानेच १५ ऑगस्ट१९४७ ला भारत स्वतंत्र झाला.२३ जानेवारी १८९७ला ओडिसा मधील कटक शहरात जन्माला आलेले नेताजी भारतासाठी चमकता तारा सिध्द झाले व स्वतंत्र भारतासाठी महान योध्दा म्हणून उदयास आले. नेताजींनी १५ वर्षाच्या वयातच स्वामी विवेकानंदांचे सर्व साहित्य वाचून काढले व देश निर्माण करण्याची ज्वाला प्रज्वलित झाली आणि देश स्वतंत्र करण्यासाठी संपूर्ण ताकदीनिशी संघर्षाला सुरुवात केली. कोलकत्यातील जेष्ठ स्वातंत्र्य सैनिक देशबंधू चित्तरंजन दास यांच्या कार्याने नेताजी प्रभावीत झाले व त्यांच्या सोबत काम करायला सुरुवात केली. २० जुलै १९२१ रोजी महात्मा गांधी व सुभाषचंद्र बोस सर्वप्रथम एकमेकांना भेटले.यावेळी गांधींजींनीसुध्दा नेताजींना दासबाबू सोबत काम करण्याचा सल्ला दिला.कारण चित्तरंजन दास हे बंगाली वकील व भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील अग्रणी पुढारी होते.त्यामुळे त्यांना देशबंधू असे संबोधले जात असे. १९२५ साली इंग्रजांच्या लक्षात आले की नेताजी क्रांतीकारकांशी संबंध ठेवतात व क्रांतीकारकांचे स्फुर्तीस्थान असल्याचे त्यांच्या लक्षात आले.ह्या कारणास्तव इंग्रज सरकारने सुभाषबाबूंना अटक केली व कोणताही खटला न चालवीता त्यांना अनिश्चित काळासाठी म्यांमारच्या कारागृहात बंदिस्त केले.नेताजींचा संपूर्ण प्रवास अत्यंत संघर्षमय व खडतड रहाला. कारण त्यांच्या व सहकाऱ्यांच्या रक्ताता-रक्तात स्वातंत्र्याची ज्वाला धगधगत होती.त्यांचे एकच स्वप्न होते ते म्हणजे भारत स्वतंत्र करणे यासाठीच त्यांनी विदेशी वारी करून इंग्रजाच्या दुश्मन राष्ट्रांशी हातमिळवणी करून भारतीय संघर्षाचा मोठा लढा आझाद हिंद सेनेच्या नेतृत्वात उभा केला. तेव्हाच १५ ऑगस्ट १९४७ ला स्वतंत्र भारत उदयास आला. कारण इंग्रजांना देशातून पळवून लावण्यात आझाद हिंद सेनेचा मोठा वाटा आहे. आझाद हिंद सेनेची स्थापना पहिल्यांदा २९ आक्टोंबर १९१५ ला राजा महेंद्र प्रताप सिगं यांनी केली.त्यावेळी आझाद हिंद सरकारची सेना म्हणून ओळखली जायची.यांचा उद्देश भारताला इंग्रजांपासुन स्वतंत्र करने.जेव्हा दक्षिण-पूर्वी एशियामध्ये जापानच्या सहयोगाने नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी ४० हजार भारतीय स्त्री-पुरूषांना प्रशिक्षीत करून सेनेत सहभागी केले त्याला सुद्धा आझाद हिंद फौज असे नाव देण्यात आल्यानंतर सुभाषचंद्र बोस यांना आझाद हिंद सेनेचा सर्वोच्च कमाण्डर नियुक्त केल्यानंतर आझाद हिंद सेनेची संपूर्ण कमान नेताजी सुभाषचंद्र बोस यांना सोपविण्यात आली आणि सुभाषचंद्र बोस यांचा क्रांतीकारी लढा सुरू झाला. नेताजी १९३३ पासून १९३६ पर्यंत युरोपमध्ये रहाले.तो काळ जर्मनच्या हिटलरचा नाझीवाद आणि इटलीचे नेते मुसोलिनीचा फासीस्टवाद असा होता.यांनी भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात सर्वतोपरी मदत करण्याचे वचन दिले.कारण या दोघांच्या निशाण्यावर इंग्लंड हाच देश होता. कारण इंग्लंडचे जगाच्या ७५ टक्के देशावर अधिपत्य होते. त्यामुळे इंग्लंडचा जगावर अतीरेक वाढत होता. कारण इंग्लंडने पहिल्या विश्व युध्दानंतर जर्मनीवर एकतर्फी करार लादण्यात आले होते. त्याचाच बदला जर्मनी इंग्लंड कडून घेणार होता. भारतावरसुध्दा इंग्रजांचे राज्य होते.त्यामुळे याच संधीचा फायदा घेण्याचे नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी मनात ठानले व नेताजींनी हिटलर व मुसोलिनी यांच्याशी हातमिळवणी केली. १९४३ मध्ये त्यांनी जर्मनीला सोडून ते जापानला जाऊन पोहोचले.जापानचे प्रधानमंत्री जनरल हिदेकी तोजो यांनी त्यांना सर्वोतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले. जापानमधून सिंगापूरला गेले.वयोवृध्द क्रांतीकारी रासबिहारी बोस ह्यांनी सिंगापूर येथील फेरर पार्कमध्ये भारतीय स्वातंत्र्य परिषदेचे नेतृत्व सुभाषबाबूंकडे सोपवीले.त्याचप्रमाणे सिंगापूर इथे कॅप्टन मोहन सिंग व्दारा स्थापित आझाद हिंद सेनेचीकमान आपल्या हाती घेतली.भारताला स्वतंत्र करण्यासाठी आझाद हिंद सरकारची स्थापना केली. तसेच आझाद हिंद सेना गठीत केली.या संघाचे प्रतीक चिन्ह असलेल्या झेंड्यावर डरकाळी मारणाऱ्या वाघाचे चित्र होते.कारण नेताजींची संपूर्ण कार्यशैली वाघासारखीच होती.आझाद हिंद सेनेने १८ मार्च १९४४ रोजी भारतभूमीत प्रवेश केला व माऊडॉक येथे त्यांनी भारताचा तिरंगा फडकावला. नेताजी ४ जुलै १९४४ ला बर्मा पोहचले. तेथुनच त्यांनी भारतीयांसाठी नारा दिला तुम मुझे खून दो मैं तुम्हे आझादी दुंगा.१९३९ ला गांधी विचारधारेला हरवुन नेताजींची काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती झाली.यावर महात्मा गांधी म्हणाले की सुभाषचंद्र बोस यांचा विजय व माझा पराजय आहे.गांधीजींच्या या वक्तव्याने व विचारांमुळे सुभाषचंद्र बोस यांचे मन दुःखावले व स्वतःहुन काँग्रेस सोडली. कारण महात्मा गांधी मवाळवादी तर सुभाषचंद्र बोस जहालवादी विचारांचे होते.परंतु दोघांचाही लढा भारत स्वातंत्र्यासाठीच होता.१९४४ मध्ये अमेरिकन पत्रकार लुई फिशर ह्यांच्याशी चर्चा करतांना महात्मा गांधींनी नेताजींना देशभक्तांचा देशभक्त असा उल्लेख केला होता. तर ४ जुन १९४४ ला सिंगापूरवरून एक संदेश देतांना सुभाषचंद्र बोस यांनी महात्मा गांधी यांना राष्ट्रपिता महात्मा गांधी म्हणुन संबोधले तेव्हा पासून महात्मा गांधींना राष्ट्रपिता संबोधल्या जावु लागले.त्यामुळे महात्मा गांधींनी अहिंसेचा मार्ग अवलंबला तर नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी क्रांतीकारीचा मार्ग अवलंबला. दोघांचाही लढा भारत स्वातंत्र्यासाठीच होता. त्यामुळेच १५ ऑगस्ट१९४७ ला भारत स्वतंत्र झाला.१८ ऑगस्ट १९४५ ला भारतासाठी दु:खद समाचार आला नेताजी सुभाषचंद्र बोस टोकियोला जातांना तैवान येथील तैहोको जवळ हवाई दुर्घटने दरम्यान नेताजींचा मृत्यू झाला व त्यांचे स्वप्न अधुरे रहाले. त्यांच्या निधनाने संपूर्ण देश स्तब्ध झाला. परंतु त्यांचे मृत शरीर अजुनही मिळाले नाही.म्हणुनच नेताजींच्या मृत्युच्या कारणांवर आज देखील विवाद सुरू असल्याचे दिसून येते.आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी आपली वाममार्गाने कमवीलेली संपूर्ण धनसंपत्ती देशहितासाठी स्वखुशीने खर्च केली तर ही खरी देशभक्ती ठरेल व नेताजींना खरी आदरांजली समजल्या जाईल.आजच्या युवा पिढीमध्ये नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे आचार-विचार जागृत होने गरजेचे आहे.कारण देश निर्माण,देशाची प्रगती,देशाचा विकास नेताजींच्या विचारांनीच जलदगतीने पुढे जावु शकतात.त्याच बरोबर मी देशवासियांना आग्रह करेल की नेताजींच्या१२८ व्या जयंतीचे औचित्य साधून प्रत्येकांनी एकतरी वृक्ष लावावेत व देशात १२८ कोटी वृक्ष एकाच दिवशी लावण्याचा संकल्प सरकारनी, संघटनांनी व जनतेनी घ्यावा.यामुळे संपूर्ण भारत निसर्ग रम्य होवून प्रदूषणावर मात करण्यात आपण यशस्वी होवू.सुभाषचंद्र बोस यांच्या १२८ व्या जयंती निमित्त कोटी कोटी प्रणाम!जय हिंद!



------------------------

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
(माजी विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर) मो.नं.९९२१६९०७७९,नागपूर

# ॲड.सचिन कांबळे यांचा वाढदिवस साजरा..

लातूर :–लातूर येथील नामवंत विधिज्ञ ड.सचिन कांबळे यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी सामाजिक,राजकीय,औद्योगिक, सांस्कृतिक, क्रीडा,सहकार क्षेत्रातील मान्यवरांनी दिवसभर शुभेच्छाचा वर्षाव केला. ड.सचिन कांबळे हे लातूर मधील सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणारे युवानेते व विधिज्ञ आहेत तसेच जिल्हा व सत्र न्यायालय,लातूर येथे वकिली व्यवसाय करतात. भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची प्रेरणा घेऊन कायद्याच्या मदतीने त्यांनी अनेक पीडितांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले आहेत. अत्यंत कमी कालावधी मध्ये लातूरभर नावलौकिक असलेले ड.सचिन कांबळे यांनी वाढदिवसाच्या निमित्ताने आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचे मुलं, एक पालक असलेली मुलं, वंचित,उपेक्षित असणारी मुलं यांचे सर्वांगीण संगोपन व विकास करणारी संस्था खुशीग्राम प्रकल्प या ठिकाणी भेट दिली व प्रकल्पातील मुलांसमवेत वाढदिवस साजरा केला. मुलांनी व त्या संस्थेतील संचालक व सहाय्यक मधुकर सोनवणे,वर्षाताई सोनवणे, यादव बल्लूरे ,वैभव दत्तनगिरे आदीनी ग्रंथ भेट देऊन शुभेच्छा दिल्या.



तसेच महाराष्ट्रातील प्रख्यात साहित्यिक तथा विचारवंत राजेंद्र लातूरकर यांची स्वगृही ड.सचिन कांबळे यांनी भेट घेऊन आशीर्वाद घेतला व सध्याच्या सामाजिक,राजकीय परिस्थितीवर सखोलपणे चर्चा केली. ड.राजेंद्र लातूरकर यांनी कायदेविषयक ३ ग्रंथ भेट देऊन सन्मान केला. दयानंद महाविद्यालयाचे माजी प्रचार्य प्रा. मिलिंद माने सर यांनी प्रत्यक्ष भेट घेऊन शुभेच्छा दिल्या.त्यांनतर जिल्हा व सत्र न्यायालय,लातूर येथे ज्येष्ठ विधिज्ञ ड.उदय गवारे,ड. शिवकुमार बनसोडे,ड.श्रीपती काकडे,ड.रमेश गायकवाड,जिल्हा वकील मंडळाचे सचिव ड.प्रदीपसिंह गंगणे,ड.सचिन मिटकरी,ड.सिद्धेश्वर धायगुडे,ड. सुहास बेद्रे,ड.ड.श्रीपती चव्हाण,ड.गणेश कांबळे,ड.अभिजीत मगर नोटरी, भारत सरकार, ड.गणेश गायकवाड,ड.देविदास बोरूळे,ड.अमर कांबळे,आदींनी वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. त्यांनतर दैनिक मराठवाडा केसरी वृत्तपत्राचे जिल्हा प्रतिनिधी यांनी प्रत्यक्ष भेट घेतली व बुके,पेन देऊन सत्कार केला. वंचित बहुजन आघाडी पक्षाचे नेते विनोद खटके यांनी देखील अभिष्टचिंतन केले व भेटवस्तू दिली. तसेच दैनिक देशोन्नती वृत्तपत्राचे उपसंपादक आनंद माने व माझं लातूर परिवाराचे समूह प्रमुख सतीश तांदळे यांनी देखील शुभेच्छा दिल्या. सायंकाळी ७.०० वा. स्नेही मित्र दयानंदभाऊ कांबळे व परिवार यांच्यावतीने आयोजित स्नेह भोजनास उपस्थिती लावली व सदरील कार्यक्रमात ह्म्यानिटी फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ.बालाजी सोळुंके,कमलाकर सुरवसे,प्रा.प्रवीण कांबळे,अजय सूर्यवंशी,साजीद शेख,किरण साबळे, विश्वास बनसोडे,विजय सुरवसे,प्रशांत सूर्यवंशी प्रीतीश सुरवसे आदि उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच दिवसभर प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे व्हाट्सएप फेसबुक,संदेशद्वारे शुभेच्छापर संदेश पाठवून अनेक विविध क्षेत्रातील नामवंत मान्यवरांनी, नगरसेवक, नगरसेविका, संघटनेचे पदाधिकारी, प्राध्यापक, शिक्षक, कर्मचारी, कार्यकर्ते आदींनी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. यावेळी वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्याबद्दल व आशीर्वाद दिल्याबद्दल सर्वांचे प्रेमपूर्वक आभार व धन्यवाद ड.सचिन कांबळे यांनी व्यक्त केले.

## केज नगरपंचायतच्या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पास मान्यता
## केंद्र व राज्य सरकारकडून ७१ लाख ८२ हजार ८५९ रुपयाचा निधी

केज/प्रतिनिधी केज नगरपंचायतच्या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पास मान्यता मिळाली आहे. स्वच्छता महाराष्ट्र अभियानांतर्गत केज नगरपंचायतला केंद्र व राज्य सरकारकडून ७१ लाख ८२ हजार ८५९रुपयाचा निधी मिळणार आहे. याबाबतची सविस्तर माहिती अशी की, स्वच्छता महाराष्ट्र अभियान अंतर्गत केज नगरपंचायतला ७५ लाख ८२ हजार ८५९ रुपयाचा निधीस घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पास राज्य शासनाने प्रशासकीय मान्यता दिली आहे. केंद्र व राज्य सरकारकडून ७१ लाख ८२ हजार ८५९ रुपयाचा निधी मिळणार आहे. सदर प्रकल्पामुळे भविष्यात केज शहर स्वच्छ व सुंदर शहर होण्यास मदत होणार आहे. केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियान अंतर्गत ( नागरी) २.० च्या धर्तीवर राज्यामध्ये स्वच्छ महाराष्ट्र अभियानांतर्गत (नागरी) २.० ची अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे. सदर अभियानांतर्गत राज्यातील सर्व शहरे कचरामुक्त करण्याचे मुख्य उद्दिष्ट असून या अभियाना अंतर्गत शहरातील सर्व प्रकारच्या घनकचऱ्याचे




शास्त्रस्रोत व्यवस्थापन आणि शाश्वत स्वच्छता व वापरलेल्या पाण्यावर प्रक्रिया करणे समाविष्ट आहे. स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरिक) २.० अंतर्गत केज नगरपंचायतला ७५ लाख ८२ हजार ८५९ रुपयांचा घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाच्या प्राप्त प्रस्तावास नगर विकास विभागाच्या प्रधान सचिवांच्या (नवी–२) अध्यक्षतेखालील झालेल्या राज्यस्तरीय तांत्रिक समितीच्या दिनांक ७ जानेवारी २०२५ रोजीच्या बैठकीत प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर प्रकल्प हा ७५ लाख ६० हजार ९०४ च्या खर्चातून होणार आहे त्यामध्ये केंद्र सरकारकडून ३७ लाख ८० हजार ४५२ रुपये आणि राज्य सरकारकडून ३४ लाख २ हजार ४०७ रुपये प्राप्त होणार आहेत. नगरपंचायतीचा लोकवटा ३ लाख ७८ हजार ४५ रुपयांचा राहणार आहे. या प्रकल्पाला मंजुरी आणल्याबद्दल नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड, जनविकास परिवर्तन आघाडीचे प्रमुख हारुणभाई इनामदार, उपनगराध्यक्ष सौ.शितलताई दांगट यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. येणाऱ्या काळामध्ये सदर निधीमुळे केज शहरातील स्वच्छतेचा प्रश्न मार्गी लागणार आहे. केज शहरातील कचरा संकलन वेळेवर होणार आहे याशिवाय शहरातील संकलित केलेल्या कचऱ्यावर प्रक्रिया होण्याची शक्यता आहे. यापुढे शहरांमध्ये कचऱ्याचे ढीग कमी होऊन शहर व परिसरात कचऱ्यामुळे होणारे प्रदूषण कमी होणार आहे. त्याचबरोबर घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प केज शहराच्या स्वच्छता व पर्यावरण संतुलन आणि नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने फायदेशीर ठरणार आहे. सदर योजना मंजूर झाल्यामुळे नागरिकांमधून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

## लातूर शहर महानगरपालिका मालकीच्या व बी ओ टी तत्वावरील गाळे धारकांना व्याजामध्ये १००% सुट

लातूर :– लातूर शहर महानगरपालिका मालकीच्या व बी ओ टी तत्वावरील व्यापारी संकुलामध्ये १७०७ गाळे संख्या आहे. सदर गाळयांची एकुण मागणी ही १३३८९६७५४/– (अक्षरी तेरा कोटी अडोतीस लक्ष शहयान्नाव हजार सातशे चौपन रु) एवढी आहे. व एकुण दंड ८७४३२१७/– (अक्षरी एत्यादऐंशी लक्ष त्र्येचाळीस हजार दोनशे सतरा रु) व एकूण व्याध १९०६१९८७/– (अक्षरी एक कोटी नव्वद लक्ष एकसष्ठए हजार नऊशे सत्याऐंशी रु) एवढे आहे. तसेच गतवर्षी लातूर शहर महानगरपालिकेच्या कार्यवाहीमध्ये मनपा मालकीचे २१ गाळे व बी ओ टी तत्वावरील ३५ गाळे असे एकूण ५६ गाळे सिल करुन ताब्यात घेतले असून त्याची लिलाव प्रक्रिया सुरु आहे. तथापि मालकीच्या व्यापारी संकुलातील गाळे धारकांची थकबाकी मोठया प्रमाणात वसूल होणे बाकी असल्याने व गाळेधारकांची मागणी असल्याने प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधुन दि.२३/०१/२०२५ ते दि.२०/०२/२०२५ पर्यंत एक रक्कमी गाळे भाडयाचा भरणा करणाऱ्या गाळेधारकांस व्याजमध्ये १००% सुट लागू करण्याचा निर्णय मनपा आयुक्त तथा प्रशासक बाबासाहेब मनोहरे यांनी घेतला आहे.

तरी याव्दारे लातूर शहर महानगरपालिका मालकीच्या व बी ओ टी तत्वावरील व्यापारी संकुलातील गाळे धारकांना आवाहन करण्यात येते की त्यांनी सदर कालावधीमध्ये गाळे भाडे भरणा करुन व्याजामधील १००% सुटचा लाभ घ्यावा असे आवाहन डॉ. पंजाबराव खानसोळे, उपायुक्त मालमत्ता यांनी केले आहे.


## जिल्ह्यातील अधिकारी, कर्मचाऱ्यांना ॲट्रोसिटी कायद्याविषयी मार्गदर्शन
## तालुका व जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांची एक दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा

लातूर :– भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था अर्थात बार्टी आणि समाज कल्याण सहायक आयुक्त कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंध कायदा १९८९ आणि सुधारित अधिनियम २०१६ याविषयी एक दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा आज पार पडली. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे झालेल्या या कार्यशाळेत जिल्ह्यातील विविध शासकीय विभागांच्या अधिकारी कर्मचाऱ्यांना या कायद्याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.




बार्टीचे प्रशिक्षण विभाग प्रमुख तथा उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते, प्रशिक्षणार्थी आयपीएस अधिकारी सागर खर्डे, विशेष सहाय्यक सरकारी वकील ड. लक्ष्मण शिंदे, बार्टीचे प्रकल्प व्यवस्थापक नितिन सहारे, सचिन नांदेडकर, प्रमुख व्याख्याते सुभाष केकान, समाज कल्याण प्रादेशिक उपायुक्त अविनाश देवसटवार, जिल्हा जात पडताळणी समितीचे उपायुक्त तेजस माळवदकर, अहमदपूरच्या उपविभागीय अधिकारी मंजुषा लटपटे, निलंगाचे उपविभागीय अधिकारी शरद झाडके, उदगीरचे उपविभागीय अधिकारी सुशांत शिंदे, पोलीस उपाधीक्षक एस. एन. राऊत, लातूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी रणजीत सावंत, निलंगाचे उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. नितीन कटेकर यांच्यासह तहसीलदार व इतर जिल्हास्तरीय, तालुकास्तरीय अधिकारी कार्यशाळेला उपस्थित होते. बार्टीचे प्रकल्प व्यवस्थापक नितीन सहारे यांनी प्रास्ताविकात कार्यशाळा आयोजनाचा हेतू विशद केला. प्रमुख व्याख्याते सुभाष केकान यांनी अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंध कायदा १९८९ आणि सुधारित अधिनियम २०१६ यामधील विविध तरतुदींबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच ड. लक्ष्मण शिंदे यांनी या कायद्याअंतर्गत गुन्हे नोंद करताना पोलीस विभागाने कोणती काळजी घ्यावी. तसेच इतर न्यायालयीन प्रक्रियेबाबत माहिती दिली. बार्टीचे सचिन गिरमे व सामाजिक न्याय विभागामार्फत पुरस्कार प्राप्त झालेले पुरस्कारार्थी, विधी महाविद्यालयाचे विद्यार्थी, समाज कल्याण कार्यालयातील अधिकार, कर्मचारी उपस्थित होते. कार्यशाळा यशस्वी होण्यासाठी सर्व तालुका समन्वयक व समतादुत यांनी परिश्रम घेतले. कार्यशाळेचे सूत्रसंचालन प्रा. अरुण धायगुडे यांनी केले. तालुका समन्वयक श्रीराम शिंदे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## भाल गावाला पाणी पुरवठा करणाऱ्या जलवाहिनी मधे(व्यास) वाढ करण्यासाठी एम.आय.डी.सी कडे मागणी



कल्याण / नाना म्हात्रे : बहीष्कृत २७ गावांतील कल्याण डोंबिवली महापालिकेतील भाल येथील नागरिकांना योग्य दाबाने पाणीपुरवठा होण्यासाठी जलवाहिनीमधे (व्यास ) वाढ करावी अशी मागणी कडोंमपा पाणी पुरवठा डोंबिवली विभागाचे कार्यकारी अभियंता श्री शैलेश जयश्री सुर्यकांत मळेकर यांनी दि १० जानेवारी २०२५ रोजी एम.आय.डी.सी चे कार्यकारी अभियंता (पा पु) यांना एका पत्राद्वारे केली असून त्याच्या प्रती मा.कडोंमपा आयुक्त महोदया व शहर अभियंता यांना पाठवल्या आहेत. आपल्या मुख्य गुरुत्व वाहीनीचा पाण्याचा दाब कमी असल्याने येथील नागरिकांना अपुरा पाणीपुरवठा होत असल्याच्या तक्रारी आहेत विद्यमान जलवाहिनी ५० एम. एम.ची असुन ती १०० एम.एम.करावी असे पत्रात म्हटले आहे तर त्या साठी लागणारे शुल्क, मीटर आदी लागणारा खर्च महापालिका करेल असे पत्रात म्हटले आहे . योग्य पाणीपुरवठा होण्यासाठी येथील नागरिकांनी. महानगरपालिकेकडे दि २४/५/२०२४, ५/९/२०२४ तर या भागातील मनसेचे भुतपूर्व आमदार मा. प्रमोद (राजू) पाटील यांनी दि.३/९/२०२४ रोजी कडोंमपा पाणी पुरवठा अधिकारी व मा. आयुक्तांना एका पत्राद्वारे केली होती.

## एज्युकेशन हब म्हणून ओळख असलेले लातूर आता ॲग्रीकल्चर हब म्हणून पुढे येतेय –जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर

लातूर ( प्रतिनिधी ) :–लातूर म्हटले की, एज्युकेशनल हब असे पटकन म्हटले जाते, तशाच प्रकारे आता लातूर म्हटले की एग्रीकल्चर हब म्हणून पुढे येत आहे याचा मनस्वी आनंद असून राज्यात सोयाबीनचे विक्रमी उत्पादन घेणारा लातूर जिल्हा आहे. लातूर जिल्ह्यात प्रामुख्याने चिंच,कोथिंबीर इतर कडधान्य त्याचबरोबर डाळीचे तर पेटंट आहे. येथे मोठ्या प्रमाणावर डाळ मिल आहेत. येथील डाळला जीआय नामांकन मिळालेले असून लातूर जिल्हा यासाठी प्रसिद्ध आहे, असे गौरवउद्गार लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यांनी काढले.

कृषी विभाग व दक्षा अनम्यांड सिस्टीम लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने मराठवाड्यात प्रथमच लातूर येथे ड्रोन दारे पीक फवारणी यंत्र विक्री व सर्विस सेंटर चे उद्घाटन बुधवारी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर यांच्या हस्ते झाले. यावेळी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर यांच्या समक्ष हरभरा पिकावर ड्रोन द्वारे फवारणीचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. यावेळी लातूर जिल्ह्यातील व पंचक्रोशीतील शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून दक्षा ड्रोन कंपनीचे प्रमुख महेश हाउळ तसेच प्रमुख वक्ते म्हणून लातूर कृषी महाविद्यालयाचे अधिष्ठाता बाबासाहेब ठोंबरे व जिल्हा कृषी विद्याव्यक्त प्राध्यापक अरुण गुत्ते, लातूर जिल्हा कृषी अधीक्षक रमेश जाधव, आत्माचे प्रकल्प संचालक शिवसाम लाडके, उपविभागीय कृषी अधिकारी दिलीप जाधव, जिल्हा परिषदेचे कृषी अधिकारी दीपक सुपेकर, कृषी उपसंचालक महेश क्षीरसागर मांजरा कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख डॉ. सचिन दिग्रसे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक कल्पना क्षीरसागर आणि दक्षा ड्रोन वितरक तथा सतीश ट्रेडिंग कंपनीचे ओनर सतीश माणिकराव देशमुख सौ.अनिताताई देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते.

लातूरचे शेतकरी सतत नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून शेती उत्पादनात राज्यात आघाडीवर असतात याचा मला सार्थ अभिमान आहे, परंतु त्याचबरोबर शेतकऱ्यांना वेळोवेळी अनंत अडचणींचा सामनाही करावा लागतो ऐन सुगीच्या दिवसात मजूर मिळत नाहीत, फवारणीच्या कामात व इतर मशागतीच्या कामात अनेक अडथळे येतात वेळेचा अव्यय होतो आणि याचा उत्पादनावर परिणाम होतो. याला पर्याय म्हणून नवनवीन तंत्रज्ञान विकसित होत आहे. यांच्या माध्यमातून शेती केल्यास याचा निश्चितच फायदा होईल. जसे की, ड्रोनद्वारे पीक फवारणी हे नवीन तंत्रज्ञान विकसित झाले असून याचा उपयोग आपण सर्व शेतकरी बांधवांनी करावा असे आवाहन करून शेतकऱ्यांचा विकास म्हणजे पर्यायाने जिल्ह्याचा विकास होतो. सर्व शेतकऱ्यांना या यंत्राचे प्रत्यक्ष व सविस्तर मार्गदर्शन करावे अशा सूचना कृषी अधिकारी व कंपनी मॅनेजमेंटला जिल्हाधिकारी ठाकूर यांनी केल्या. तसेच माझ्या शेतकरी बांधवांसाठी आयोजित केलेल्या या उपक्रमाबद्दल कृषी विभाग, दक्षा कंपनी आणि वितरक सतीश देशमुख यांचे कौतुक केले.

प्रगतशील शेतकरी या धोरणानुसार कृषीचे यांत्रिकीकरण होते आहे, या प्रक्रियेतला महत्त्वाचा टप्पा म्हणजे ड्रोनद्वारे पिकाची फवारणी, यामुळे मनुष्यबळाची गरज नसते आणि फवारणीच्या वेळेस साप चावण्याचे प्रमाण वाढले आहे यामुळे शेतकऱ्यांना यापुढे आपला जीव धोक्यात घालावा लागणार नाही आणि जास्तीत जास्त क्षेत्र कमीत कमी वेळेत फवारले जाते या ड्रोन खरेदीवर पाच लाखा रुपये पर्यंतचे सरकारकडून अनुदान दिले जाते. यासाठी ऑनलाईन व ऑफलाईन अर्ज उपलब्ध आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे शेती ही फायदेशीर असून शेतकऱ्यांनी याचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा कृषी अधीक्षक रमेश जाधव व उपविभागीय कृषी अधिकारी दिलीप जाधव यांनी केले.

दक्षा ड्रोन कंपनीचे प्रमुख महेश हाऊळ यांनी या ड्रोनचे उत्पाद चेन्नई येथे झाले असून ड्रोन च्या विश्वासारतेबाबत कोणतीही शंका घेण्याचे कारण नसल्याचे सांगितले.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE